**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

# विद्यापीठामध्ये शैक्षणिक कामाकरिता बाहेरगावावरुन येणाऱ्या विद्यार्थ्यांना निःशुल्क राहण्याची सुविधा

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये विविध शैक्षणिक कामानिमित्त बाहेरगावावरुन विद्यार्थी येतात, पण त्यांचे त्या दिवशी काम न झाल्यास त्यांच्या राहण्याकरिता परीक्षक वसतिगृहातील कक्ष एका दिवसाकरिता निःशुल्क पुरविण्याची व्यवस्था कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांच्या सूचनेनुसार सुरु झाली आहे. तसा आदेश परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी जाहीर केला आहे.

एका दिवसापेक्षा जास्त दिवस विद्यार्थ्यांना रहावयाचे काम पडल्यास त्यांना प्रतिदिन ३०/- रूपये दर आकारण्यात येईल. विद्यापीठामध्ये विविध शैक्षणिक कामाकरिता विद्यार्थी येतात, त्यांचे त्या दिवशी काम न झाल्यास त्यांना शहरामध्ये राहण्याचा विनाकारण भूर्दंड पडतो, कधीकधी गैरसोय सुद्धा होते. ही बाब लक्षात घेता आणि विद्यार्थी केंद्रीत विद्यापीठ करण्याचा कुलगुरूंचा प्रयत्न, या दृष्टीकोनातून कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी ही सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांचे विद्यार्थ्यांकडून सार्वत्रिक अभिनंदन करण्यात येत आहे. या संदर्भात परीक्षा विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ३०/१०/२०२०.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी